**धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करुन आरक्षणाच्या मागणीच्या अनुषंगाने शिष्टमंडळ/अभ्यासगट स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग**

**शासन शुध्दीपत्रक क्र : धसयो-२०२४/प्र.क्र.१७५/योजना-२**

३ रा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक: २० सप्टेंबर, २०२४.

**वाचा:-** शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र : बैठक-२०२३/प्र.क्र.३०१(२)/योजना-२, दि.२०/११/२०२३

**शासन शुध्दीपत्रक :-**

मध्यप्रदेश, बिहार व तेलंगणा या राज्यांनी त्यांच्या अधिकारामध्ये त्या राज्यांतील जातनिहाय यादीमध्ये समावेश असलेल्या जाती/जमातींना जात प्रमाणपत्र तसेच अन्य लाभ उपलब्ध करुन देण्याबाबत अवलंबिलेल्या कार्यपध्दतीचा अभ्यास करण्यासाठी संदर्भाधिन शासन निर्णय, दि.२०/११/२०२३ अन्वये शिष्टमंडळ/अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामधील **परिच्छेद क्रमांक २ खालीलप्रमाणे आहे** :-

२. सदर शिष्टमंडळ/अभ्यासगटाची "कार्यकक्षा" खालीलप्रमाणे राहील :-

सदर शिष्टमंडळाने राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण/लाभ देण्याच्या मागणीच्या अनुषंगाने, मध्यप्रदेश, बिहार व तेलंगणा या राज्यांनी त्यांच्या अधिकारामध्ये त्या राज्यांतील जातनिहाय यादीमध्ये समावेश असलेल्या काही विशिष्ट जाती/ जमातींना अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र तसेच अन्य लाभ देण्याबाबत अवलंबिलेल्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या हेतूने :-

(१) सदर शिष्टमंडळ/अभ्यासगटाने मध्यप्रदेश, बिहार व तेलंगणा या राज्यांतील संबंधित कार्यालयांना भेटी देऊन त्या राज्यातील विशिष्ट जातींना अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ देण्यासाठी अवलंबिलेल्या कार्यपध्दतीचा अभ्यास करणे.

(२) मध्यप्रदेश, बिहार व तेलंगणा या राज्यांनी संविधानातील अथवा त्या राज्यांच्या कायद्यातील ज्या तरतुदींचा आधार आरक्षण/लाभ देताना घेतला त्याबाबतचे अभिलेख/कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे. तसेच काही प्रकरणी न्यायालयीन प्रकरणे उद्भवली असल्यास त्याबाबतची माहिती/ कागदपत्रे/ दस्तऐवज उपलब्ध करुन घेणे.

(३) सदर शिष्टमंडळ/अभ्यासगटाने आवश्यकतेनुसार असा लाभ मिळालेल्या संबंधित जाती/जमातींच्या शिष्टमंडळाशी चर्चा करुन आवश्यक माहिती/कागदपत्रे/दस्तऐवज उपलब्ध करुन घेणे.

**त्याऐवजी परिच्छेद क्रमांक २ खालीलप्रमाणे वाचावा :-**

सदर शिष्टमंडळाने राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण/लाभ देण्याच्या मागणीच्या अनुषंगाने, मध्यप्रदेश, बिहार, तेलंगणा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, कर्नाटक व गोवा या राज्यांनी त्यांच्या अधिकारामध्ये त्या राज्यांतील जातनिहाय यादीमध्ये समावेश असलेल्या काही विशिष्ट जाती/ जमातींना अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र तसेच अन्य लाभ देण्याबाबत अवलंबिलेल्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या हेतूने :-

(१) सदर शिष्टमंडळ/अभ्यासगटाने , मध्यप्रदेश, बिहार, तेलंगणा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, कर्नाटक व गोवा या राज्यांतील संबंधित कार्यालयांना भेटी देऊन त्या राज्यातील विशिष्ट जातींना अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ देण्यासाठी अवलंबिलेल्या कार्यपध्दतीचा अभ्यास करणे.

(२) मध्यप्रदेश, बिहार, तेलंगणा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, कर्नाटक व गोवा या राज्यांनी संविधानातील अथवा त्या राज्यांच्या कायद्यातील ज्या तरतुदींचा आधार आरक्षण/लाभ देताना घेतला त्याबाबतचे अभिलेख/कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे. तसेच काही प्रकरणी न्यायालयीन प्रकरणे उद्भवली असल्यास त्याबाबतची माहिती/ कागदपत्रे/ दस्तऐवज उपलब्ध करुन घेणे.

(३) सदर शिष्टमंडळ/अभ्यासगटाने आवश्यकतेनुसार असा लाभ मिळालेल्या संबंधित जाती/जमातींच्या शिष्टमंडळाशी चर्चा करुन आवश्यक माहिती/कागदपत्रे/दस्तऐवज उपलब्ध करुन घेणे.

**तसेच, संदर्भाधिन शासन निर्णय, दि. २०.११.२०२३ मधील परिच्छेद क्रमांक ३ खालीलप्रमाणे आहे :-**

उक्त शिष्टमंडळ/अभ्यासगटाने वरील कार्यकक्षेच्या आधारे आपला स्वयंस्पष्ट अभ्यासअहवाल आवश्यक सर्व संबंधित कागदपत्रे/ दस्तऐवजासह किमान तीन महिन्याच्या आत शासनास सादर करावा.

**त्याऐवजी परिच्छेद क्रमांक ३ खालीलप्रमाणे वाचावा :-**

उक्त शिष्टमंडळ/अभ्यासगटाने वरील कार्यकक्षेच्या आधारे आपला स्वयंस्पष्ट अभ्यासअहवाल आवश्यक सर्व संबंधित कागदपत्रे/दस्तऐवजासह दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत शासनास सादर करावा.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०९२०१७४८४०४७३४ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DINESH ROHIDAS CHAVAN

Digitally signed by DINESH ROHIDAS CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OTHER BACKWARD BAHUJAN WELFARE DEPARTMENT, 2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C2377ED235498603821D49922A210871FF6FB9B369722AC707AEE7DCD87F2BD, cn=DINESH ROHIDAS CHAVAN
Date: 2024.09.23 16:19:37 +05'30'

**( दिनेश चव्हाण )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उप मुख्यमंत्री (गृह), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (इतर मागास बहुजन कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (महसुल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री (ग्रामविकास व पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. श्री. गोपीचंद पडळकर, विधानपरिषद सदस्य
८. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
१०. प्रधान सचिव (इतर मागास बहुजन कल्याण विभाग) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.
११. सचिव ( आदिवासी विकास विभाग) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.
१२. डॉ. सुधाकर शिंदे (भारतीय राजस्व सेवा)
१३. श्री. दे.आ. गावडे, सह सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई

१४. श्री. संतोष वि.गावडे,उप सचिव, महसुल विभाग, मंत्रालय,मुंबई
१५. श्री. धनंजय सावळकर, अप्पर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक,(मानव संसाधन) महानिर्मिती,मुंबई
१६. श्री. जगन्नाथ महादेव वीरकर,अप्पर जिल्हाधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई यांचे विशेष कार्य अधिकारी
१७. श्री. जे. पी. बघेल
१८. ॲड. एम.ए. पाचपोळ
१९. श्री. माणीकराव बापुराव दांगडे पाटील
२०. इंजी. जी. बी. नरवटे
२१. निवड नस्ती (योजना-२).